ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627


# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३६ पुणे, बुधवार, ३ जून, १९७० अंक ११


# विविधोपयोगिता

किर्लोस्कर पंपांचे हे वैशिष्ट्य होय !



गेल्या अर्ध शतकाहून अधिक काळ आम्ही अनेक प्रकारच्या उपयोगांसाठी विविध प्रकारचे पंप तयार करीत आहो. किर्लोस्कर पंपाच्या प्रत्येक भागांत आमची श्रेष्ठ दर्जाबद्दलची परंपरा आणि उत्पादनाचा दीर्घ अनुभव व आधुनिक तंत्रज्ञान यांचा संयोग झाला आहे.

**विविध प्रकारच्या
किर्लोस्कर पंपांची उपयुक्तता**

• शेतीला पाणी पुरवठा • पिकावर पाणी शिंपडण्याच्या योजना • वॉटर वर्क्स • बूस्टर सर्व्हिस
• सीवेज • ड्रेनेज • सॅंडी वॉटर • स्टॉर्म वॉटर
• फायर फायटिंग • खाणी • रासायनिक, कागद व साखर कारखाने • प्रोसेसिंग प्लँटस् • व्हिस्कस लिक्विडस्
• तेलशुद्धि कारखाने • डेअरीज • डिस्टिलरीज
• खत कारखाने

किर्लोस्कर®

**किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड**
उद्योग भवन, टिळक रोड, पुणे-२.



### आयुर्विमा कॉर्पोरेशनने उद्दिष्ट ओलांडले

१९६९–७० च्या आर्थिक वर्षात आयुर्विमा कॉर्पोरेशनने १,००० कोटी रुपयांहून अधिक किमतीचे नवे विमे उतरविले आहेत. १,३०५ कोटी रुपयांचे नवे विमे उतरवून कॉर्पोरेशनने ठरविलेल्या उद्दिष्टापेक्षाही पुढे मजल मारली आहे. १९६८–६९ सालात मुंबई येथील एका शाखेने ६·५९ कोटी रुपयांचा नवा धंदा मिळवून पहिला क्रमांक पटकाविला होता. ह्याच शाखेने १९६९–७० सालातही ७·६४ कोटी रुपयांचा नवा धंदा मिळवून आपले स्थान टिकवून धरले आहे. एजंटात अहमदाबाद-मधील एका एजंटाने १·४२ कोटी रुपयांचा नवा धंदा मिळविला आहे. परदेशातील म्हणजे नैरोबीतील एका एजंटाने १·३५ कोटी रुपयांचा नवा धंदा मिळवून दुसरा क्रमांक पटकाविला आहे.

### प्राचीन शिल्पकृतींची चोरटी निर्यात पकडली—

मुंबई येथील विमानतळावरून काही प्राचीन शिल्पकृती चोरून परदेशी पाठविण्यात येत होत्या. परंतु विमान-तळावरील कस्टम्सच्या अधिकाऱ्यांनी संशयित पेट्या अडवून त्या तपासल्या. त्यामुळे ही चोरटी निर्यात उघडकीस आली. अड-विण्यात आलेल्या दोन लाकडी पेट्यांतून १२ व्या शतकातील दोन प्राचीन शिल्पकृती होत्या. त्या गुजरात अगर राजस्थान-मधील जैन देवळातून पळविण्यात आल्या असाव्या असा तर्क आहे. ब्रिटनमधील एका प्रसिद्ध व्यापाऱ्याच्या नावाने पेट्या पाठविण्यात आल्या होत्या. हा व्यापारी प्राचीन कलाकृतींच्या व्यापारासाठी प्रख्यात आहे. अधिकाऱ्यांनी शहरात काही ठिकाणी धाडी घालून गुन्हेगारी स्वरूपाची काही कागदपत्रे जप्त केली आहेत. ह्या कृत्यामागे आंतरराष्ट्रीय धागेदोरे सापडले आहेत.

### भविष्य सांगणारे मनगटी घड्याळ

न्यूयॉर्कमध्ये १०० डॉलर्सना मिळणारे एक नव्या धर्तीचे घड्याळ वेळ तर दर्शवितेच, परंतु त्याबरोबर दररोज सकाळी तो दिवस चांगला, मध्यम किंवा वाईट, कसा जाईल, हेहि सांगते. त्या घड्याळाला 'सर्टिना बायोकॉम्प्यूटर' असे नाव दिलेले आहे. आधुनिक तंत्रविद्या आणि पुरातन अंधश्रद्धा ह्यांचा त्या घड्याळात मिलाफ झालेला आहे. घड्याळ विकत घेतल्या-नंतर खरेदीदाराची जन्मतिथी विचारून ते परत कारखान्याकडे धाडण्यात येते. कॉम्प्यूटरच्या सहाय्याने खरेदीदाराच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक जीवनाशी घड्याळ जोडले जाते आणि तीन पट्ट्यांच्या सहाय्याने घड्याळ भविष्य वर्तविते. तीनही पट्ट्या तांबड्या रंगाच्या झाल्या, म्हणजे त्या दिवशी आकाश ठेंगणे होणार म्हणून समजावे! प्रत्येक रंगाच्या पट्टीची फिरण्याची गती वेगवेगळी असल्याने चांगले आणि वाईट दिवस येण्याचे संभव मधूनमधून येत राहातात.

### लष्करी माहिती मिळविण्यासाठी होणारा अवाढव्य खर्च

जगातील भूप्रदेशाची वाटणी सार्वभौम देशात झालेली आहे. सर्वच देशांचे एकमेकांशी असलेले अनेकविध संबंध गेल्या काही वर्षात दळणवळणाच्या व वाहतुकीच्या आधुनिक साधनांनी अधिक निकटचे झाले आहेत. म्हणून अमेरिकेसारख्या मोठ्या देशाला शांततेच्या आणि युद्धाच्या काळी माहिती मिळविण्या-साठी अफाट खर्च करावा लागतो. अमेरिकेच्या लष्करी, नाविक आणि वैमानिक माहिती मिळविणाऱ्या संघटना दरसाल सुमारे २ अब्ज, १० कोटी डॉलर्स खर्च करतात. अमेरिकन काँग्रेसच्या प्रतिनिधिगृहापुढे मांडण्यात आलेल्या कागदपत्रावरून ही गोष्ट उघड झाली आहे. माहिती मिळविण्याच्या संघटनेलाच हेरगिरीचे खातेही म्हणता येईल. अमेरिकेचे हेरखाते साधी व मामुली हेरगिरी, शत्रूच्या प्रदेशाची चित्रे घेऊन नकाशे काढणे, गुप्त दळणावळणाची साधने वापरणे, सांकेतिक लिपीचा अर्थ लावणे, इत्यादी अनेक बाबींवर खर्च करीत असते. अमेरिकेच्या हेरखात्यात सध्या १ लाख, ३६ हजारांवर लोक काम करीत आहेत. त्यांची संख्या आता कमी करण्यात येणार असली तरीही ती बरीच मोठी राहील. त्याचप्रमाणे हेरगिरीवर करण्यात येणारा खर्चही कमी करण्यात येणार आहे. जागतिक राजकारणात पुढारीपणाने वावरणाऱ्या अमेरिकेला हा खर्च करणे भागच पडत असावे. पण, इतक्या मोठ्या प्रमाणावर खर्च करणे अमेरिकेसारख्या समृद्ध देशालाच परवडण्यासारखे आहे. रशियाच्या हेरगिरीचे जाळेही जगभर पसरलेले आहेच.

**साखरेच्या साठ्यात १९० कोटी रु. गुंतून पडणार—** १९६९–७० अखेर भारतात साखरेचा साठा १२ लक्ष टन होता. चालू वर्षअखेरचे उत्पादन खपापेक्षा ६ लक्ष टन अधिक भरेल आणि १९ लक्ष टन साखर शिल्लक राहील. त्यामुळे १९० कोटी रु. गुंतून पडतील.

**मद्रासमधील स्टँडर्ड मोटारीचा कारखाना बंद— स्टँडर्ड** हेरल्ड मोटारी आणि एकटनी ट्रक्स बनविणाऱ्या स्टँडर्ड मोटार प्रॉडक्टस ऑफ इंडिया लि. ने उत्पादन थांबविण्याचा निर्णय केला आहे. सरकारी नियंत्रित किमतीमुळे प्रत्येक मोटारीमागे कंपनीला २,००० रु. नुकसान येत होते. भारतात मोटारी करणाऱ्या तीन कारखान्यांपैकी हा एक कारखाना होता. इतर दुसरे म्हणजे फिआटचा (मुंबई) आणि हिंदुस्तान ॲंबेसेडरचा (कलकत्ता).

**आर्थिक मदत द्या, लष्करी नको — फिलिपाइन्स** देशाच्या पार्लमेंटपुढे अधिकारारूढ पक्षाच्या एका खासदाराने काहीसे स्पष्ट भाषण केले. तो म्हणाला की अमेरिकेला फिलिपाइन्स देशाला मदत देण्याची खरोखरच इच्छा असेल तर तिने लष्करी मदत देण्याऐवजी आर्थिक मदत देण्यावर अधिक भर द्यावा. असे केल्याने अमेरिकेतल्या ह्या भागातील हितसंबंधांनाही बळकटी प्राप्त होईल.

☆ अर्थ ☆

बुधवार, ३ जून, १९७०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

## किमती वाढण्याची शक्यता फारशी नाही

नियोजन समितीचे उपाध्यक्ष डॉ. ध. रा. गाडगीळ ह्यांनी चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाविषयी आपले विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात की राज्यांनी साधनसंपत्ती गोळा करण्यासाठी चालविलेले प्रयत्न आणि सध्याची किमतींची पातळी लक्षात घेता चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची अमलबजावणी यशस्वीपणे करता येईल असे वाटते. अलीकडे किमतीची पातळी थोडीशी उंचावल्यासारखी भासते. पण हीच प्रवृत्ती वाढीस लागून किमती आणखी चढत जातील असे मानण्यास आज तरी जागा दिसत नाही. गेल्या वर्षी किमतीच्या वाढीची सरासरी अवघी ३ टक्के होती. परंतु त्यापूर्वीच्या दोन वर्षात किमती थोड्याशा खालीच आल्या असल्याने एकंदरीने किमती फारशा चढलेल्या नाहीत असेच म्हणावे लागेल. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या लोकांना मदत करण्यासाठी कार्यक्रमात काही पैसा राखून ठेवण्यात आला आहे. तथापि हा एक प्रयोगच म्हणावा लागेल. प्रयोगाअंती काही फलनिष्पत्ती झाल्याचे दिसून आल्यास जास्त तपशीलवार मदतीच्या योजना आखता येतील. कार्यक्रमाच्या अवधीत राज्यांनी १,१०० कोटी रुपये उभे करावे असे ठरवून देण्यात आले आहे. त्यांना इतका पैसा उभारणे शक्य होईल ह्याविषयी शंका बाळगण्याचे कारण दिसत नाही. १९६९–७० साली त्यांनी पैसा उभा करण्याचे जे प्रयत्न केले ते ह्याविषयी केलेल्या प्राथमिक अंदाजाशी मिळतेजुळते आहेत. चालू आर्थिक वर्षात मात्र राज्य सरकारांकडून ज्या अपेक्षा करण्यात आल्या होत्या त्या पूर्णांशाने सफल झालेल्या नाहीत.

## श्रीमंत शेतकऱ्यांवर अधिक करभार?

दिल्ली येथील इंडियन इंटरनॅशनल सेंटर ह्या संघटनेपुढे बोलताना संघ सरकारच्या अर्थखात्यातील एका बड्या अधिकाऱ्याने श्रीमंत शेतकऱ्यांनी सर्वकाळ करापासून सूट मिळेल अशी अपेक्षा करू नये असे सूचित केले. श्रीमंत शेतकऱ्यांना आगामी काळात पाणीपुरवठ्यासाठी व विजेसाठी अधिक कर द्यावे लागतील अशी शक्यता आहे. त्याचप्रमाणे त्यांच्याकडून घेण्यात येणारा साराही वाढण्याचा संभव आहे. ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांकडून त्यांच्या ऐपतीप्रमाणे चढत्या श्रेणीने कर घेण्याची एक योजना अर्थखात्याच्या विचाराधीन आहे. कर आकारणीच्या बाबतीत शहरी विभागावर अन्याय होतो; दरसाल त्यावरील कर वाढविण्यात येतात अशी तक्रार करण्यात येते. पण ती खरी नाही. ग्रामीण भागाकडे कर-आकारणीच्या बाबतीत दुर्लक्ष करण्यात येते हे म्हणणेही खरे नाही. गेली कित्येक वर्षे शेतकरी सरकारला सारा देत आहेत. त्याशिवाय रोजखर्चाच्या सर्व वस्तूंवर ते अप्रत्यक्ष कर देत आहेतच. तेव्हा देशाच्या विकासाच्या कार्यात ग्रामीण भाग आपला योग्य तो वाटा उचलीत आहे असेच म्हणावे लागेल. एकूण करांपैकी दोनतृतीयांश कर हे अप्रत्यक्ष आहेत. ह्या वर्षीच्या अंदाजपत्रकात शेतीच्या मालमत्तेवर संपत्तिकर बसविण्यात आला आहे. त्याशिवाय वारसाकर आहेच. यंदाच्या अंदाजपत्रकात २२५ कोटी रुपयांची तूट दाखविण्यात आली आहे. इतक्या पातळीवरील तुटीच्या अर्थसंकल्पामुळे अर्थव्यवस्थेवर काही विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाही. परदेशी हुंडणावळीबाबतची भारताची परिस्थितीही चांगली आहे.

## सुशिक्षित बेकारांना प्रतिष्ठित नोकऱ्या पाहिजेत

पंजाबमधील नांगल फर्टिलायझर कारखान्याने सुशिक्षित बेकारांना कामधंदा देण्यासाठी एक योजना आखून वृत्तपत्रांत तिची प्रसिद्धी केली होती. वृत्तपत्रांत आलेल्या जाहिरातींना सुशिक्षित बेकारांकडून जो प्रतिसाद मिळाला त्यावरून योजनेच्या प्रवर्तकांनी असा निष्कर्ष काढला आहे की कामधंदा शोधणाऱ्या सुशिक्षितांना प्रतिष्ठित आणि पोषाखी स्वरूपाच्या नोकऱ्या पाहिजे आहेत. कमिशन मिळवून देणारा धंदा स्वतःच्या कर्तबगारीवर उभारण्याची त्यांची तयारी दिसून आली नाही. कारखान्याच्या जाहिराती वाचून पंजाब, हरिआणा, राजस्तान, हिमाचल प्रदेश, चंदीगड आणि दिल्ली ह्या राज्यांतील ३,००० तरुणांनी अर्ज केले होते. ह्या अर्जदारांकडे कारखान्याच्या चालकांनी एक तीन पानी प्रश्नपत्रिका धाडली होती. पत्रिकेत स्वतंत्र धंद्याविषयी तपशील देण्यात आला होता आणि उमेदवारांची स्वतःचे पैसे गुंतविण्याची कितपत तयारी आहे ह्याची माहिती मागविण्यात आली होती. प्रश्नपत्रिकेवरून उमेदवारांच्या हे लक्षात आले की त्यांना पगारी नोकरी मिळणार नसून कमिशनवर दुकानदारी करावी लागणार आहे. तेव्हा फक्त ५४० जणांनी प्रश्नपत्रिका भरून पाठविल्या. त्यांपैकी १५५ जण कामाच्या स्वरूपाला लायक असे ठरले. त्या सर्वांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले. परंतु त्यांपैकी ४६ जणच आले. ३२ जण काम करण्यास लायक असे ठरले. म्हणून त्यांना ७ आठवड्यांच्या प्रशिक्षणासाठी पाचारण करण्यात आले. प्रशिक्षण चालू असताना चांगला मेहनताना देण्यात येणार असूनही फक्त २२ जण प्रशिक्षणासाठी हजर झाले.

### ग्रामीण भागातील बँकिंग व्यवसायाला आव्हान

हिंदमधील १४ प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आल्यानंतर ग्रामीण जनतेला बँकांचा फायदा पटवून देण्यासाठी आणि खेडेगावांतील सावकारांच्या पाशांतून जनतेला सोडविण्यासाठी खेडेगावी बँकांच्या शाखा स्थापन करण्याचा कार्यक्रम आखण्यात आला. १९७० सालात ज्या विभागांत बँकांची सोय नाही अशा विभागांत १,१८० शाखा काढण्याचे ठरविण्यात आले त्याप्रमाणे आतापर्यंत २९१ शाखांनी आपले काम सुरूही केले आहे. ग्रामीण भागांत शाखा उघडल्यानेच केवळ ग्रामीण भागांत बँकिंगचा व्यवसाय मूळ धरेल असे मानता येणार नाही. बँका आपले काम हेतुपूर्वक पार पाडतात की नाही ह्यावरच कार्यक्रमाचे यशापयश अवलंबून राहील. ह्या दृष्टीने बँकांनी सुरू केलेल्या पाहणीचे महत्त्व विशेष आहे. एखाद्या ग्रामीण विभागात गुदामे बांधणे, वाहतुकीची व्यवस्था करणे, बाजारपेठा कमावणे ह्याबाबतीत किती कर्जाची आवश्यकता आहे ह्याची पाहणी करण्याचे काम बँकांनी सुरू केले आहे. शेतीचा व शेतीच्या मालाचा उपयोग करून बनविलेला औद्योगिक माल ह्यांच्या साठवणीला व वाहतुकीला ह्या प्रकारच्या पाहणीमुळे मदत होणार आहे. ग्रामीण भागांतील अनेक पतपेढ्या नादार ठरलेल्या आहेत म्हणून राष्ट्रीयीकृत बँकांनी पतीवर कर्जपुरवठा करताना काळजी घेणे आवश्यक आहे. दिलेल्या कर्जाचा दैनंदिन गरजांसाठी उपयोग होतो किंवा काय ह्याकडे नीट लक्ष देण्यात आले पाहिजे. त्याचबरोबर कर्ज घेणाराच्या पतीच्या भक्कमपणाविषयी विश्वसनीय माहिती गोळा करणेही अगत्याचे आहे.

---

### शास्त्रीय व तांत्रिक कार्यात समतोलाचा अभाव

हिंदमधील शास्त्रीय व तांत्रिक विकासासंबंधी भारत सरकारला सल्ला देण्यासाठी एक कमिटी स्थापन करण्यात आलेली आहे. १९६९ सालच्या कमिटीच्या अहवालात ह्या क्षेत्रातील कार्यासंबंधी माहिती देण्यात आली आहे अहवालात असे म्हटले आहे की, शास्त्रीय व तांत्रिक कार्याच्या विविध क्षेत्रांचा अभ्यास करून त्यांची योग्य आखणी करण्यासाठी मध्यवर्ती संघटना नाही. त्यामुळे विविध क्षेत्रांत समतोलपणा राहिलेला नाही. संशोधन आणि विकास ह्यांवर होणाऱ्या खर्चात बऱ्याच ठिकाणी समतोल खूपच ढळलेला आहे. उदाहरणार्थ, नैसर्गिक साधनसंपत्तीचा विकास आणि शास्त्रीय व तांत्रिक प्रशिक्षण देऊन माणसे तयार करणे ह्या कार्याकडे पुरेसे लक्ष देण्यात आलेले नाही. शास्त्रीय व तांत्रिक ज्ञानाची समतोल वाढ झाली तरच आर्थिक विकास होणे शक्यतेच्या कोटीत येते. अत्यंत कुशल असे शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ तयार झाले तर आर्थिक प्रगती साधण्याचे काम सुकर होते. अहवालात नमूद केलेल्या माहितीप्रमाणे १९३८-३९ साली शास्त्रीय व तांत्रिक विकासासाठी अवघी २७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. १९६९-७० साली १३६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. ह्या खर्चाच्या रकमेत मध्यवर्ती सरकार, राज्यसरकारे आणि खाजगी संघटना ह्यांनी केलेल्या खर्चाचा समावेश आहे. एकूण खर्चापैकी ९४ टक्के खर्च सार्वजनिक मालकीच्या विभागाने केलेला आहे. खाजगी मालकीच्या विभागाच्या खर्चाचा वाटा अवघा ६ टक्के आहे. ठोक राष्ट्रीय उत्पादनातील टक्केवारीच्या हिशेबाने ४ थ्या कार्यक्रमाच्या अखेरीस ०·५ टक्के इतका खर्च होईल.

---

**NESS WADIA COLLEGE OF COMMERCE
POONA 1**

Will reopen after the Summer Vacation on 15th June 1970. It admits students to the following classes :

(1) Pre-Degree Commerce

(2) First Year Commerce (Banking & Sales Management as optional subjects)

(3) Second Year Commerce

(4) Third Year Commerce (ADVANCED ACCOUNTANCY & ADVANCED BANKING AS OPTIONAL SUBJECTS)

From this year, THE COLLEGE WILL ALSO HAVE M.COM. CLASSES.

Special facilities, scholarships and stipends are provided for first class students, sportsmen and poor students. Very soon, the college will have ITS NEW BUILDING which is under construction.

Admissions : 9 a. m. to 2 p. m.

B. S. Bhanage
Principal

---

**एम्. ई. एम्. कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे ४**

नव्या वर्षासाठी दि. १ जूनपासून प्रवेश देण्याचे काम सुरू होत आहे. १९७० च्या मार्च-एप्रिल मध्ये झालेल्या विद्यापीठ परीक्षांत या कॉलेजांतून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्वरित प्रवेश घ्यावा.

जुलै १९७० पासून कॉलेजात एम्. कॉम. चे वर्गही सुरू होत आहेत. १९७०-७१ साली पार्ट १ चे व १९७१-७२ साली पार्ट २ चे पेपर्स शिकविले जातील.

श. वा. चिरमुले
प्राचार्य

## रिकामा वेळ घालविण्यास मदत करणाऱ्या धंद्यात वाढ

यंत्रयुगात काही जणांना तरी रिकामा वेळ कसा घालवावा ते समजत नाही. वास्तविक जगातील बहुसंख्य लोकांना फुरसतीचा वेळ मिळाला तर तो पाहिजे आहे. पण त्यांना तो मिळत नाही. एक तर कंबर ढिली होईपर्यंत काम केल्यावर त्यांना रिकाम्या वेळेचा आनंद लुटता येत नाही. शिवाय मर्यादित प्राप्तीचे बंधन असतेच. भारतासारख्या अविकसित देशात बरीच माणसे बेकार तरी असतात किंवा अतिश्रमित तरी असतात. अमेरिका आणि पश्चिम युरोपातील प्रगत देश ह्यांची स्थिती मात्र वेगळी आहे. तेथील औद्योगिक समाजात माणसांचे काम करण्याचे तास कमी होत चालले आहेत. त्यामुळे त्यांना रिकामा वेळ अधिक मिळू लागला आहे. आजच्या कामगाराला त्याच्या आजोबाच्या काळापेक्षा २२ वर्षांचा अधिक रिकामा वेळ मिळू लागला आहे. काही उद्योग व्यवसायात तर दर आठवड्याला २४ तास अधिक सवड त्याला मिळू लागली आहे. ह्याचा परिणाम असा झाला आहे की रिकामा वेळ घालविण्याची साधने व संधी देणाऱ्या उद्योगधंद्यांचा विस्तार तेथे सतत होऊ लागला आहे. १९५८ ते १९६६ च्या दरम्यान फ्रान्समध्ये रिकामपणाच्या धंद्यावरील खर्च दुपटीने वाढला आहे. फावला वेळ मजेने घालविण्यासाठी लोक नाटके, सिनेमा, रेस्टॉरॉ, पुस्तके, वृत्तपत्रे, क्रीडा करण्याची साधने, ह्यावर वाढता खर्च करीत आहेत. फ्रान्सच्या लोकांनी ह्या गोष्टीवर १९६६ साली १७८ कोटी डॉलर्स खर्च केले. स्पेनमध्ये १९५८ ते १९६५ च्या दरम्यान हा खर्च तिपटीने वाढला आहे.

पश्चिम जर्मनीत ह्या गोष्टीवर ५०० कोटी डॉलर्स खर्च होतात. स्वीडनमध्ये १०० कोटी डॉलर्स खर्च होतात आणि अमेरिकेत २,५०० कोटी डॉलर्स खर्च होतात. ह्या खर्चाशिवाय परदेश प्रवासावर होणारा खर्च वेगळाच. रिकामा वेळ असल्याशिवाय परदेशगमन शक्य होत नाहीच. ऑस्ट्रिआ, स्विटझरलंड, पोर्तुगाल, स्पेन, आयर्लंड, इत्यादी देशांच्या अर्थव्यवस्थेत परदेशीय प्रवाशांपासून होणाऱ्या प्राप्तीला महत्त्वाचे स्थान आहे. ह्या देशांच्या राष्ट्रीय उत्पादनातील ४ ते ६ टक्के उत्पादन परदेशी लोकांच्या प्रवासाशी निगडीत आहे. रिकामा वेळ घालविण्यास साह्य करणाऱ्या उद्योगधंद्यांचा विस्तार झाल्यामुळे काही देशांच्या अर्थव्यवस्थेत बदल घडून येत आहे. अमेरिकेत 'बोलिंग' नावाचा एक खेळ आहे. गेल्या १२ वर्षांत ह्या खेळाने आपले हातपाय चांगलेच पसरले आहेत. १९६६ मध्ये तीन अमेरिकन नागरिकांपैकी १ जण ह्या खेळात भाग घेत होता. जपानमध्येही ह्या खेळाचा बराच प्रसार झाला आहे. अर्थात खेळाशी संबंधित असलेल्या धंद्यात अनेक जपानी कामगारांना रोजगार मिळाला आहे. बर्फावरील घसरगीत रस घेणाऱ्या जपानी लोकांची संख्या ६० लाखांच्या घरात आली आहे. अमेरिकेत व कॅनडात सुमारे १० वर्षांपूर्वी ह्या खेळाची केंद्रे अवघी ७६ होती; आता त्यांची संख्या ७०० झाली आहे. त्याचप्रमाणे सुट्या मजेत घालविण्यासाठी छोट्यामोठ्या सफरी काढण्याची वृत्तीही फोफावली आहे. अमेरिकेतील नागरिक रिकामा वेळ घालविण्यासाठी कोट्यवधी डॉलर्स खर्च करीत आहेत. एखादा देश फावला वेळ घालविण्यासाठी किती खर्च करतो ह्यावरून त्याची प्रगती अजमावण्याची वेळ आता आली आहे.

---

## हंगेरीत हिप्पी तरुणांचा सुळसुळाट

सभ्यपणा व शिष्टाचार ह्यांना फाटा दिलेल्या गलिच्छ हिप्पी तरुणांचे गट भारतामधील शहरांतून दिसतात. जगभर तरुणांत जी अस्वस्थता पसरली आहे तिचाच हा एक उद्रेक आहे. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे हिप्पी तरुणांचे उगमस्थान अमेरिकेसारख्या समृद्ध देशापुरतेच मर्यादित नाही. आर्थिक नियोजनाची कास धरलेल्या आणि ग्राहकोपयोगी मालाच्या निर्मितीवर कडक बंधने असणाऱ्या हंगेरीसारख्या कम्युनिस्ट देशांतही हिप्पी तरुणांचा सुळसुळाट झाला आहे. हिप्पी बनून देशात भटकण्याची एक लाटच तेथील तरुणांत उसळलेली दिसते. वेडेवाकडे राखलेले केस आणि स्वैर पोषाख ही त्यांची दोन वैशिष्ट्ये असतात. हंगेरीत अशा प्रकारचे ४ हजार तरी गट असावे असा अंदाज करण्यात आला आहे. हिप्पींच्या मुक्त जीवनात गाण्याबजावण्याला महत्त्वाचे स्थान असते. परिणामी हंगेरीत इलेक्ट्रिक गिटार ह्या वाद्याची वार्षिक विक्री ९,००० पर्यंत वाढली आहे. प्रतिष्ठित समाजजीवनापासून फारकत झालेले हे तरुण चोरी सारख्या 'वाममार्गाचा आश्रय करून संगीताच्या वाद्यांची व ध्वनिक्षेपकांची चोरी करण्यासही मागेपुढे पाहात नाहीत. हंगेरीच्या कम्युनिस्ट पक्षाला ह्या घटनांची फार चिंता लागून राहिली आहे. तरुण पिढीपुढे कोणतेच आदर्श नसल्यासारखी ती वागत आहे. त्यामुळे भविष्यकाळात देशाचा कारभार चालविण्यास लायक अशी जबाबदार माणसेच उपलब्ध होणार नाहीत असे पक्षप्रमुखांना वाटू लागले आहे. पक्षाची मध्यवर्ती समिति ह्या प्रश्नाचा गंभीरपणे विचार करीत आहे.

---

**पोलंडला लोहखनिजाची निर्यात**—पोलंडला ४·२३कोटी रु. किंमतीचे लोहखनिज निर्यात करण्याचे कंत्राट भारताने मिळविले आहे. लोहखनिजाची पोलंडला करण्यात येणारी निर्यात वाढविण्यात खनिज व धातू व्यापार मंडळाला यश येत आहे. १९६८–६९ साली पोलंडने भारताकडून २ लाख टन खनिज घेतले होते. त्याची किंमत १·४ कोटी रुपये होती.

**आयुर्विम्याच्या पगारी प्रचारिका**— शिक्षित, तरतरीत मुलींना विम्याच्या प्रचारिकांचे पूर्ण वेळ काम देण्याची एक योजना आयुर्विमा कॉर्पोरेशनने आखली आहे. त्यांना कामावर मिळणाऱ्या नेहमीच्या कमिशनखेरीज दरमहा १५० रुपये पगार देण्यात येणार आहे. दोन वर्षांनंतर त्यांना मिळणाऱ्या कमिशनच्या पोटी फक्त पगाराची वजावट करण्यात येईल.

### पिपामागे ७५ पैसे वाढीपासून लिबियाला ९३० कोटी रु. अधिक मिळणार

लिबियाला खनिज तेलाच्या किमती वाढवून मिळविण्याच्या बाबतीत लिबियाच्या क्रान्तिकारक सरकारला यश आले आहे. तेलधंद्यात गुंतलेल्या २१ परदेशी कंपन्यांप्रमाणे अमेरिकेच्या मालकीच्या एस्सो कंपनीने लिबियाच्या भाववाढीला मान्यता दिली आहे. दर पिपामागे जो सांप्रतचा २ डॉलर, २१ सेंटचा भाव आहे त्यात १० सेंटची म्हणजे ७५ पैशांची वाढ झाली आहे. आजच्या घडीला लिबियाचे खनिज तेलाचे उत्पन्न ३४ लक्ष पिपे आहेत. या ७५ पैशांच्या भाववाढीमुळे लिबियाची रोजची आवक २५ लक्ष, ५० हजार रुपयांनी वाढली आहे. म्हणजे वार्षिक आवकीमध्ये ९३० कोटी रुपयांची वाढ होईल.

खनिज तेलाचे भाव वाढवून मिळविण्यात लिबियाला तशीच सबळ कारणे होती. लिबियाच्या खनिज तेलामध्ये गंधकाचे प्रमाण फारच कमी आहे. लिबियातून खनिज तेल नेण्यास सुवेज कालव्याचा उपयोग करण्याची आवश्यकता नाही. युरोपीय बाजारपेठेला ते अधिक जवळ आहे. गंधकाचे प्रमाण कमी असल्याकारणाने शुद्धीकरणाचा आणि अंतर कमी असल्याकारणाने खनिज तेल घेऊन जाण्याचा खर्च कमी येतो. अमेरिकन कंपन्यांना लिबियाच्या खनिज तेलापासून दरसाल १०० कोटी डॉलर म्हणजे ७५० कोटी रुपये नफा होतो. याशिवाय फ्रान्स, ब्रिटन आणि अन्य देशी कंपन्यांना जो नफा होतो तो वेगळाच.

खनिज तेलाच्या कामगारांच्या निवासस्थानाची उत्तम व्यवस्था, त्यांच्या वेतनात वाढ, शिक्षणाचा व्यापक कार्यक्रम आणि वरच्या श्रेणीमध्ये लिबियाच्या नागरिकांची नेमणूक वगैरेची अमलबजावणी करण्याचे प्रश्न लवकरच हाती घेण्यात येतील.

---

### जागतिक आरोग्य संघटनेची धूम्रपानाविरुद्ध मोहीम

जागतिक आरोग्य संघटनेने धूम्रपानाविषयी एक अहवाल अलीकडे प्रसिद्ध केला आहे. ह्या संघटनेचे १२८ सभासद देश आहेत. सभासद देशांच्या आरोग्य खात्यांनी आपल्या देशांत धूम्रपानाविरुद्ध जोराची मोहीम उघडावी अशी सूचना अहवालात करण्यात आली आहे. संघटनेच्या वार्षिक सभेत अहवाल सादर करण्यात आला. धूम्रपानामुळे व्यसनासक्तांच्या आरोग्याला कसा व किती धोका पोचतो ह्याविषयी सभासद देशांनी जोरदार प्रचार करावा आणि या कामी शिक्षणसंस्था, आरोग्यविषयक धंदेवाईक संघटना व इतर सामाजिक संस्था ह्यांचे साह्य घ्यावे असे सुचविण्यात आले आहे. सिगारेटसच्या पाकिटांवर आणि जाहिरातींत त्यामधील विषारी द्रव्यांची माहिती देण्यात यावी. त्याशिवाय ह्या द्रव्यांमुळे होणाऱ्या हानीचा धोकाही स्पष्ट करण्यात यावा असे सुचविण्यात आले आहे. सिगारेटसच्या जाहिराती आणि खप कमी करण्यात यावा व असेरचे उद्दिष्ट म्हणून धूम्रपानाच्या उच्चाटनाचे उद्दिष्ट ठरविण्यात यावे असे अहवालात म्हटले आहे. जगातील देशांना धडा घालून देण्यासाठी जागतिक असेंब्लीच्या आणि तिच्या कमिट्यांच्या बैठकीत धूम्रपानाला बंदी करण्यात आली आहे. ह्याबाबतच्या ठरावाला ६८ मते अनुकूल पडली, विरोधी मत एकही पडले नाही. ११ देश तटस्थ राहिले. त्यात इंडोनेशिआची गणना आहे. धूम्रपानाचे आरोग्यावर होणारे परिणाम चव्हाट्यावर मांडण्यासाठी एक जागतिक आरोग्य दिन भरविण्याची सूचनाही ठरावात करण्यात आली आहे.

---

### ऑस्ट्रेलिआतील हिंदी योगिनीचा उपक्रम

भारतामधून ऑस्ट्रेलियातील सिडने शहरी जाऊन, तेथे स्थायिक झालेली एक हिंदी योगिनी तेथे नवा आश्रम स्थापन करण्याच्या विचारात आहे. तिचे नाव आहे स्वामी सरस्वती. योगमार्गाची दीक्षा तिला तिच्या वडिलांनी १५ वर्षांपूर्वी दिली. ऑस्ट्रेलिआत जाण्यापूर्वी स्वामी सरस्वती ह्यांनी दक्षिण आफ्रिका, फिजी बेटे, सिंगापूर, इत्यादी ठिकाणी योगविद्येचा प्रसार करण्याचे कार्य केलेले आहे. ऑस्ट्रेलिआतील एका छायाचित्रकाराशी त्यांनी विवाह केलेला आहे. स्वामी सरस्वती ह्यांच्या योगविद्येच्या प्रसाराच्या कामात त्यांचे पती मदत करतात. दूरदर्शन केंद्रावरील त्यांचे कार्यक्रम त्यांचे पतीच तयार करतात. योगविद्येच्या प्रसाराशिवाय हिंदी बनावटीच्या कलावस्तू, हिंदी संगीताची वाद्ये, हस्तकौशल्याच्या वस्तू, ह्यांची विक्री करण्याचे कामही त्या करतात. सिडने शहरापासून दूर असलेल्या ग्रामीण विभागात ध्यानचिंतनाचा एक नवा आश्रम स्थापन करण्याचा त्यांचा विचार आहे. त्यासाठी त्यांनी मोठी जमीनही मिळविली आहे. त्या ठिकाणी एक हिंदु मंदिरही बांधण्याचा त्यांचा मानस आहे. सिडने येथे अलीकडे बरेच हिंदी विद्यार्थी शिकण्यासाठी येतात. त्यांना अशा मंदिराची जरुरी भासत आहे. आश्रमात आत्मशक्ती जागृत करण्याची आस्था असणाऱ्यांचा संघ बनविण्यात येणार आहे. स्वामी सरस्वतींची आत्मशक्तीवर नितांत श्रद्धा असल्याने त्यांनी संघाला 'आत्मशक्ती संघ' असे नाव ठेवण्याचे ठरविले आहे. संघाचे सभासद हिंदूंची प्राचीन वाद्ये वाजविण्यास शिकतील. त्यांच्या गाण्यांमधून अमली औषधे आणि निसर्गाशी मानवकृत नासाडी ह्याविरुद्ध प्रचार केला जाईल. त्याचप्रमाणे परस्पर सामंजस्याचा पाठपुरवठा केला जाईल.

---

**दरडोई उत्पन्नात वाढ** — चौथ्या पंचवार्षिक योजनेअखेर भारताचे दरडोई उत्पन्न ६३६ रुपयापर्यंत वाढेल असा अंदाज आहे. १९६८–६९ साली हे उत्पन्न ५४६ रुपये होते. त्याचप्रमाणे १९७३–७४ अखेर राष्ट्रीय उत्पन्न २८,८०० कोटीपासून ३७,००० कोटी रुपयांपर्यंत वाढेल अशी अपेक्षा आहे.

# बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे अपेक्षित अप्रत्यक्ष फायदे

## व्यवहारक्षमतेमधील सुधारणेचे व्यापक हितकारक परिणाम

( डॉ. वसंत पटवर्धन, जॉईंट जनरल मॅनेजर, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे २ )

१४ प्रमुख हिंदी व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा हेतू आजवर उपेक्षित असलेल्या व्यक्तींना आणि उपक्रमांना बँकिंगचा फायदा मिळवून देणे हा होता. ह्या प्रत्यक्ष फायद्याबरोबर समाजाला इतरही काही फायदे राष्ट्रीयीकरण केलेल्या व्यापारी बँकांची व्यवहारक्षमता सुधारून अप्रत्यक्षरीत्या कालांतराने मिळणार आहेत.

स्टेट बँक आणि तिच्या सात उपबँका ह्यांप्रमाणे आता आणखी १४ बँका पब्लिक सेक्टरमध्ये आल्या आहेत. ह्या २२ बँकांकडे ८५% ठेवी असून एकूण कर्जांपैकी ८५% कर्जे त्यांनी दिलेली आहेत. प्रायव्हेट सेक्टरमधील बँकांवर भागधारकांना डिव्हिडंड वाटण्याची जबाबदारी होती. त्यासाठी नफा कमविणे त्यांना अपरिहार्य होते. म्हणजे, कारभारावर काही मर्यादा आल्याच. परंपरागत बँकिंगच्या कल्पनेप्रमाणे त्यांचे व्यवहार चालत. राष्ट्रीयीकरण केलेल्या बँकांचे बाबतीत नफ्याची कल्पना सोडून दिलेली नाही, परंतु त्यांची कार्याची व्याप्ती मात्र वाढलेली आहे. वैयक्तिक नफ्यापेक्षा राष्ट्राचे हित आणि सामाजिक उद्दिष्ट ते पाहातील. त्या अधिकाधिक जबाबदाऱ्या उचलतील, त्यामुळे कालांतराने नफ्यात जी वाढ होईल त्याचा फायदा राष्ट्राला मिळेल. अधिकाधिक शाखा उघडण्यास त्यांना संकोच वाटणार नाही. ठेवी गोळा करण्यासाठी त्या ग्रामीण भागात जाऊ शकतील. पब्लिक सेक्टरमधील २२ बँकांनी एकमेकांत अधिकाधिक एकवाक्यता आणण्याचे ठरविले आहे. राष्ट्रीयीकृत बँकांच्या को-ऑर्डिनेशन कमिटीत आता स्टेट बँक ऑफ इंडियाही आली आहे. ह्या कमिटीच्या निर्णयांमुळे त्या सर्वांच्या कारभारात बऱ्याच बाबतीत एकसूत्रीपणा येईल

मुंबई, कलकत्ता, मद्रास, दिल्ली, चंदिगड आणि गोवा शहरे वगळून भारताच्या ३३५ जिल्ह्यांसाठी 'लीड बँक' योजना रिझर्व्ह बँकेच्या नेतृत्वाखाली आखण्यात आली आहे. चालू वर्षी १,२५८ शाखा उघडण्यात येतील आणि येत्या पाच वर्षात सुमारे ७,००० शाखा नव्याने सुरू होतील. शाखा उघडण्याचे बाबतीत बँका स्पर्धा टाळतील. त्याचप्रमाणे मोनॉपलीही टाळतील. प्रत्येक जिल्ह्याची आर्थिक विकासाच्या दृष्टीने आणि मुख्यतः बँकिंगच्या विकासाच्या दृष्टीने पाहणी केली जाईल, आणि आर्थिक-औद्योगिक विकासाशी बँकिंगच्या विकासाचा मेळ घातला जाईल. ग्रामीण जनतेचे सावकारांवरील अवलंबन कमी होईल आणि बँकिंगच्या प्रवाहात सावकार सामील होतील. आजवर फक्त रोख पैशानेच होत असलेले व्यवहार बँकिंगच्या कक्षेत येतील; त्यांची कार्यक्षमता वाढेल. अर्थात, ही गोष्ट झटपट होणारी नाही; यथावकाश घडून येईल.

गेल्या वर्षापर्यंत स्वतःच्या गरजेप्रमाणे, कामाप्रमाणे आणि कार्यक्षेत्राप्रमाणे स्वतःचे धोरण आखण्यास, कार्यपद्धती ठरविण्यास बँका स्वतंत्र होत्या. त्यामुळे, बँका-बँकांत फरक पडत गेला. त्या सर्वांत आता एकवाक्यता येईल. ठेवी स्वीकारण्याचे, पैशाच्या रेमिटन्सचे, कर्ज देण्याचे, कर्जदाराची पात्रता अजमावण्याचे फॉर्म्स सर्व बँकांचे सारखेच होतील. कोणत्याही सेफ्टी रेझरमध्ये कोठल्याही देशात तयार झालेले पाते बसते, तसे ह्या फॉर्म्सचे बाबतीत घडून येईल. कर्मचाऱ्यांचे काम त्यामुळे हलके होईल आणि बचत झालेला वेळ इतर कामाकडे कारणी लावता येईल. त्यामुळे आपोआपच बहुसंख्य जनतेला बँकांच्या कार्यपद्धतीचे शिक्षण मिळेल.

राष्ट्रीयीकृत बँका आपल्या कर्जदार गिऱ्हाइकांसंबंधी माहिती एकमेकांना पुरवू शकतील; त्यातून 'एक बँक एक गिऱ्हाइक' ह्या तत्त्वाप्रत जाता येईल. सर्व माहिती एकत्रित झाल्यामुळे पुनरावृत्ती टळेल; गिऱ्हाइकांशी प्रत्यक्ष बोलणी करण्याचे प्रसंग कमी होतील आणि कर्जदारांची कामे सत्वर पार पाडता येतील. कर्जे देण्याच्या बाबतीतील बँका-बँकांतील स्पर्धा आता उरली नसल्यामुळे कर्जाची प्रकरणे अधिक बुद्धिनिष्ठपणे आणि स्वतंत्र दृष्टीने हाताळता येतील; काहींना जरुरीपेक्षा जास्त होणारा कर्जपुरवठा लक्षात घेऊन त्याला पायबंद घालता येईल. ही शिस्त आपोआपच घातली जाऊन राष्ट्राच्या आर्थिक व्यवहाराची कार्यक्षमता सुधारण्यात मदत होईल.

पब्लिक सेक्टरमधील बँका आता काही कार्यक्रम सांघिकपणे हाती घेऊ शकतील. समान हेतूसाठी असलेल्या जाहिराती सर्वांनी मिळून करता येतील. त्यामुळे खर्चात बचत होईल. रेडिओवर, टेलिव्हिजनवर आणि सिनेमाच्या पडद्यावर प्रचार करता येईल. सामान्य माणसाच्या माहितीसाठी आणि उपयोगासाठी माहितीपट काढता येतील आणि स्वतःच्या आर्थिक उत्कर्षासाठी बँकांची मदत कशी घ्यावयाची हे त्याला समजावून सांगता येईल. गैरमाहितीमुळे आणि अज्ञानामुळे निर्माण होणाऱ्या संघर्षाचे क्षेत्र कमी होईल.

कोणत्याही बँकेच्या ट्रॅव्हलर्स चेकचे पैसे तत्त्वतः कुठेही मिळायला हवेत. पण बँका हा धंदा करण्यास उत्सुक नसत. कारण त्यात फारशी किफायत नव्हती. आता अशा सेवांच्या बाबतीत किफायतीच्या हिशेबीपणाला महत्त्वच उरलेले नाही; राष्ट्रीयीकृत बँका आता काचकुच न करता अशा चेक्सच्या व्यवहारास चालना देतील. अखिल भारतीय पातळीवर गायरो पद्धतीचा आणि क्रेडिट कार्डाचाही बँका हळूहळू विचार करू लागतील; त्यामुळे चेक नापास होऊन परत येण्याची दुकानांना

भीती उरणार नाही. बँकिंगची कार्यक्षमता सुधारून धंद्यातही पद्धतशीरपणा वाढेल. ज्याचे चेक परत येतात, त्याचे बँक खाते बंद केले जाण्याच्या भीतीमुळे (दुसरी राष्ट्रीयीकृत बँक त्याचे खाते घेणार नाही) चेक परत येण्याचे प्रमाण उतरेल.

आतापर्यंत बँकांचा दैनंदिन कारभार इंग्रजीतून चालत असे. देशाच्या अधिकाअधिक अंतर्गत प्रदेशात बँका जाऊ लागल्यामुळे, त्यांना स्थानिक भाषेचा अधिकाअधिक उपयोग करणे क्रमप्राप्तच होईल. त्यामुळे कारभाराची कार्यक्षमताही सुधारेल. गिऱ्हाइकांना व्यवहार समजणे सोपे जाईल; स्वतःच्या भाषेत अडचणी सुलभतेने मांडता येतील. त्यांनी भरावयाचे फॉर्म त्यांच्याच भाषेत असल्यामुळे त्यांचे आकलन चांगले होईल. बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले नसते, तरी हळूहळू हे घडून आलेच असते; राष्ट्रीयीकरणामुळे ग्रामीण भागातील शाखांची संख्या झपाट्याने वाढत आहे, त्यामुळे ही सुधारणा त्वरित होणार आहे, एवढेच. बँकांनी नव्या जबाबदाऱ्या पत्करल्या म्हणजे कामाची वाटणीही घडून येईल. ट्रेझरीच्या कामाचे उदाहरण घेऊ. या सध्या फक्त स्टेट बँका आणि तिच्या उपबँका ह्यांच्याकडेच हे काम सोपविलेले आहे. त्यांच्या एकूण फक्त २,६५० शाखा आहेत. राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांच्या ४,५०० शाखाही हे काम करू शकतील. त्यामुळे स्टेट बँकेच्या शाखांवरील बोजा वाटला जाऊन कमी होईल आणि लोकांना कामासाठी फार खोळंबावे लागणार नाही. जास्त जनतेची ट्रेझरी कामाची सोय होईल.

ठेवी जमा करणे आणि विविध क्षेत्रांत कर्जपुरवठा करणे, एवढेच काम बँका आता करीत नाहीत. रेमिटन्स आणि बिल कलेक्शन ही महत्त्वाची कामेही बँका करतात. राष्ट्रीयीकरणापूर्वी, प्रत्येक बँकेची एजन्सीची स्वतःची व्यवस्था होती आणि ह्या एजन्सी बँकेकडे कलेक्शनसाठी बिले पाठविण्यात येत. गिऱ्हाइकांवर त्यामुळे दोन बँकांचे कमिशन आकारले जाई; ते आता टाळता येईल. एजन्सीची अखिल भारतीय व्यवस्था घडवून आणता येईल. म्हणजे मग कुठलीहि राष्ट्रीयीकृत बँक भारतातील इतर कुठल्याहि राष्ट्रीयीकृत बँकेवर ड्राफ्ट आणि मेल ट्रॅन्स्फर्स काढू शकेल. त्यामुळे गिऱ्हाइकांची सोय वाढेल. सरकार आणि पब्लिक सेक्टरमधील कंपन्या आता राष्ट्रीयीकृत बँकांच्या शाखांचा सर्रास उपयोग करू शकतील; "विशेष पसंतीची खास बँक" आता उरताच कामा नये. उदाहरणार्थ, आयुर्विमादारांनी कुठल्याही राष्ट्रीयीकृत बँकेत हप्ते भरायला हरकत नाही. मध्यवर्ती आणि राज्य सरकारांचे कर कुठल्याही शाखेत भरता आले, म्हणजे काही बँकांवरच पडणारा ताण कमी होईल; भरणा केंद्रे वाढून जनतेचीही सोय होईल. मध्यवर्ती सरकार, राज्य सरकारे आणि ह्या बँका ह्यांचेमध्ये सतत विचारविनिमय होत राहिला हवा आणि तसा तो राहीलही. नॅशनल क्रेडिट कौन्सिल आणि नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिल ह्यांनीही एकत्र येऊन बँकांना मार्गदर्शन करायला हरकत नाही.

आतापर्यंत, राष्ट्रीयीकृत बँकांनी स्वतःच्या सोयीप्रमाणे परदेशांत शाखा उघडल्या होत्या. परदेशी हुंडणावळीचा धंदा परदेशांतील बँकांबरोबर चालू होता. ह्या सर्व व्यवहारासाठी एकच बँक असावी असा आता सूर ऐकू येत आहे. अशा बँकेस सर्व जगभर अधिक मानाचे स्थान मिळेल. ह्या एक्झिम बँक ऑफ इंडियास भांडवलाचा मजबूत पाया असेल; परदेशांत भारतीयांची ती उपयुक्त सेवा करू शकेल. भारताबद्दल परदेशात सदिच्छा वाढविण्याचे कार्यही करू शकेल. तिच्या परदेशांतील शाखा हिंदी मालाची कायम प्रदर्शने ठेऊन प्रचार केंद्रे बनू शकतील. प्रारंभ म्हणून मलेशियाचे कायद्यांना अनुसरून मलेशियासाठी एक स्वतंत्र बँक स्थापन केली जात आहे. परदेशांतील हिंदी बँकिंगचे अशा रीतीने नवे पर्व सुरू होत आहे. आयात-निर्यात व्यापाराचे राष्ट्रीयीकरण जरुरीचे झाले तर त्याला हे उपकारकच होईल.

बँकांतील व्यवहारात यंत्रांचा उपयोग, हा एक मोठ्या वादाचा आणि अप्रिय असा विषय आहे. भारतात बेकारीचा भस्मासूर असताना, कर्मचाऱ्यांची संख्या कमी करणे हा यांत्रिकीकरणाचा हेतू असूच शकणार नाही. परंतु, जेथे फार मोठ्या प्रमाणावर व्यवहार चालतात, अनेक ठिकाणच्या व्यवहारांत अचूक आणि योग्य माहितीच्या उपलब्धतेच्या अभावी एकसूत्रीपणा आणणे कठीण असते, तेथे काही प्रमाणात तरी यांत्रिकीकरण अपरिहार्य ठरते. बँकांतील विविध प्रकारचे कंटाळवाणे काम कमी करण्यासाठी सोपीसोपी यंत्रे उपयोगी असतात. पब्लिक सेक्टरमधील २२ बँकांच्या १५ हजार शाखा स्थापन झाल्या आणि त्या एकमेकांवर ड्राफ्ट काढू लागल्या किंवा अखिल भारतीय पातळीवर अशाच इतर सोयी उपलब्ध करून देऊ लागल्या, म्हणजे त्यांना माणसाकरवी जलद काम करून घेणे अशक्यप्राय होईल. लक्षावधि चेक्सची क्लिअरिंग हाऊसच्या मर्यादित वेळात निवडानिवड करण्यासाठी यंत्रांची मदत अगत्याची होईल. काही गणिती यंत्रे आणि काम्प्यूटर्सही बसवावे लागतील. अशा यंत्रांचा उपयोग करणे फार वेळ लांबणीवर टाकता येणार नाही. त्यांची प्रस्थापना झाल्यावर राष्ट्रीयीकृत बँकांची व्यवहारक्षमता आणखी सुधारेल.

बँकांच्या चालकांना राष्ट्रीयीकरणामुळे स्वतःची कार्यक्षमता वाढविण्यास नवे दालन मिळाले आहे. त्याचा उपयोग करून घेणे व त्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे त्यांचे काम आहे. शाखावाढीमुळे प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा प्रश्न त्यांचेपुढे ठाकला आहे; कर्मचाऱ्यांना कार्यकुशल करण्यासाठी त्यांना झटावे लागणार आहे. सध्या प्रत्येक बँकेची स्वतःची ट्रेनिंगची व्यवस्था आहे, परंतु कार्यपद्धतीमधील विविधतेमुळे ट्रेनिंगची प्रगती मंद आहे. सर्वच बँकांत एकच कार्यपद्धती आली म्हणजे

सर्व उमेद्वारांना समान शिक्षणक्रम लागू करता येईल. नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ बँक मॅनेजमेंटची अधिकारी पातळीवरील व्यवस्थापकांच्या ट्रेनिंगसाठी नुकतीच स्थापना झाली आहे. राष्ट्रीयीकृत बँकांच्या पद्धतीला वाहून घेण्याचे शिक्षण मिळाल्यामुळे, ह्यापुढील काळातील व्यवस्थापनापासून बरीच अपेक्षा करावयास हरकत नाही. राष्ट्रीय पातळीवर आगाऊ अंदाज बांधून नियोजन करता येईल आणि सर्वसाधारण परस्पर सहकार्य, नियंत्रण आणि क्रियाशीलतेला आवाहन ह्यांचा सुपरिणाम दिसून येईल.

(आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून " दि चॅलेंज ऑफ अवर टाइम्स —बँकांचे राष्ट्रीयीकरण—व्यवहार-क्षमतेत सुधारणा " ह्या विषयावर १४ मे, १९७० रोजी रात्री ९–१५ वाजता केलेले भाषण—आकाशवाणीच्या सौजन्याने उद्धृत.)

---

## परदेशी वास्तव्य करणारे हिंदी डॉक्टर

हिंदमध्ये लोकसंख्येच्या मानाने डॉक्टरांची संख्या अपुरी आहे. त्यातही ग्रामीण भागात डॉक्टरांचा तुटवडा फारच जाणवतो. डॉक्टर लोक खेडोपाडी जाऊन व्यवसाय करण्यास नाखूष असतात. त्याला अनेक कारणे आहेत. उलट, परदेशात मात्र हजारो डॉक्टर काम करीत आहेत. भारत सरकारच्या आरोग्य खात्याने परदेशी काम करीत असलेल्या हिंदी डॉक्टरांची यादी लोकसभेला सादर केली. ह्या यादीवर नजर टाकली तर हिंदी डॉक्टर परदेशात बरेच लोकप्रिय झाल्याचे दिसते. परदेशातील हिंदी डॉक्टरांची सर्वात अधिक संख्या ब्रिटनमध्ये आहे. तेथे सुमारे ४ हजार हिंदी डॉक्टर राष्ट्रीय आरोग्य योजनेत काम करीत आहेत अगर खाजगी व्यवसाय करीत आहेत. त्या खालोखाल अमेरिकेत हिंदी डॉक्टर आहेत. त्यांची संख्या २,२४५ आहे. किनिआत ३५० व टॅन्झॅनिआत २२० हिंदी डॉक्टर आहेत. १३ डॉक्टर स्वीडनमध्ये व्यवसाय करीत आहेत. १४ मस्कतमध्ये काम करीत आहेत. इंडोनेशिआत ३, हाँगकाँगमध्ये ५ आणि त्रिनिदादमध्ये ५ डॉक्टर आहेत. रशिआत फक्त १ च हिंदी डॉक्टर आहे. इतर अनेक देशांत असलेल्या हिंदी डॉक्टरांची संख्या ५०० च्या घरात आहे. ज्या देशात हिंदी डॉक्टर व्यवसाय करीत नाहीत अगर सरकारी नोकरीतही नाहीत अशा देशांची संख्या फारच थोडी आहे. परदेशात उच्च विद्याभ्यासासाठी जाणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांत डॉक्टर विद्यार्थीही असतात. त्यांची संख्या धरली तर परदेशातील हिंदी डॉक्टरांची संख्या आणखीच वाढेल.

---

मदत देण्यात जपानचा ४ था क्रम—१९६९ साली जपानने विकसनशील देशांना १ अब्ज, २६ कोटी, ३१ लाख डॉलर्स अथवा ९४७ कोटी रुपयांची मदत दिली. १९६८ सालाशी तुलना करता मदतीत २०·४ टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसते. अमेरिका, पश्चिम जर्मनी आणि फ्रान्स ह्या पहिल्या तीन देशांनंतर जपानचा अनुक्रम लागतो.


## FERGUSSON COLLEGE, POONA 4.

The college will reopen on the 15th June, 1970 for the academic year 1970-71. Applications for admission should be made in the prescribed form immediately after the results of the qualifying examinations are declared.

Poona — V. N. Dhavale
20th May, 1970. — Principal

---

## D. E. Society's
## Brihan Maharashtra College of Commerce
## Poona-4

**" Admission For The Academic Year 1970-71 "**

The College will reopen on 15th June, 1970 for the academic year 1970-71. Enrollment will begin from 2nd June 1970. In view of the limited accommodation, admissions to the B. Com. Pt. I, S. Y. B. Com. and T. Y. B. Com. classes will be given in the first instance to the students of this College. Students from other Colleges will be admitted, only if some vacancies are available. The students of this College should take admission before 14-6-1970. **Hours for admissions :— 11-00 a. m. to 2-00 p. m.**

1) Students should note the following slight change in the College timings for the new academic year :—

P.D.Com. and T.Y.B.Com : 8-00 a.m. to 11-20 a.m.
F.Y.Com. and S.Y.B.Com ; 11-45 a.m. to 2-45 p.m.

2) The programme of admission to the various classes will be as follows :—

| | |
|---|---|
| S.Y.B.Com. and T Y.B.Com. | : From 2nd June onwards. |
| **P.D.Commerce** | **: From 6th June onwards.** |
| **B.Com. Part I.** | **: From 12th June onwards.** |
| **M.Com** | **: From 16th June onwards.** |

**( M.Com. Classes will begin from 1st July 1970 )**

Students of this College must bring their Identity Card with them at the time of registering their names.

3) Students seeking admission to the Pre-Degree Commerce class should bring with them the following along with the admission form :—

(1) S. S. C. Statement of Marks
( Two typed copies of the same )
(2) School leaving certificate (......do......)
(3) Identity card-size Photograph
(Two Copies)

Forms of admission and Copies of the Prospectus will be available in the College Office during office hours.

N. K. Kulkarni
Principal

# नहीं —
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खानालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैः १. रंगहीन द्रव कार्बन डायऑक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



कमल सोडा वाटर यंत्र — घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ३७६१०१

हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)